श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ३ रें.] कार्तिक शके १८४७ [अंक ८ वा

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम्॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

## अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... ... ३०१-३०८

स्फुट विषय ... ... ... ... ... २२०-२४०

श्री साईसच्चरित ... ... ... ... १७३-१८८


## मासिकाच्या वर्गणीदारास विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची छपाई व खर्चवच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यामधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतोल, व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केलीं तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्सरोड, वांद्रें बी. बी. सी. आय. रेल्वे.


## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु. ३।≈ व्ही. पी. नें रु. ३।। चालू अंक -।≈ मागील अंक शिल्लक असल्यास -।।-

पूर्वीच्या अंकात व्ही. पी. नें रु. ३।।≈ चुकून छापलें गेलें. असेंच यंदा ज्या कांहीं वर्गणीदारांकडे रु. ३।।। ची व्ही.पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचेकडें जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.

शके १८४७ वैशाख व ज्येष्ठाचा जोड अंक नं. २-३ आणि आषाढचा अं. ४ यांत श्रीसाईबाबांच्या छापलेल्या फोटोच्या कांहीं प्रतीसाठीं मागणी आल्यावरून त्या प्रत्येक फोटोच्या ५०० प्रती छापवून तयार आहेत. ज्या कोणास त्या संग्रहीं ठेवण्याची इच्छा असेल त्यानें प्रत्येक प्रतीसाठीं ८२ च्या तिकीटें व आपला पत्ता पाठवावा म्हणजे हे फोटो त्यांजला बु.पो.नें पाठविण्यांत येतील.





समाधीचे वाड्याचे देखावे.

# श्री सांई-विरह-दुःखोद्गार !

( दिंडीवृत्त. )

१

अकस्मातंचि आकाश कोसळावें।
धरणि कंपित होवोनि गृह पडावें।
नभीं चमके एकाकि वीज जेंवी।
नाथ ! कळलें तव विरह-वृत्त तेंवी ॥

२

लया जातां धन, कृपण मानवातें— ।
दुःख हृदयीं अनिवार जेंवि होतें।
तुझ्या विरहाचें वृत्त ऐकुनीयां— ।
तेंचि झालें, बहु दुःख मानसीं या ॥

३

सांइ ! येती जन नित्य जे दुरोनी ।
दर्शनाची मनिं वासना धरोनी ।
तयां भक्तांची आस पूर्ण केली ।
तुझ्या योगें विख्यात ' शिर्डि ' झाली ॥

४

मूर्ति उन्नत ! तव सगुणरूपकाय ।
पुन्हां पाहिन मी नयनिं भुवनिं काय ?।
चरण सोज्वळ शिर्डीस देखियेले।
अकस्मातचि लोपोनि कुठें गेले ? ॥

५

सांई ! आतां तुज सांग, कुठें पाहूं ? ।
चरण-विरहित भुवरीं कसा राहूं ?।
दीन दुबळ्यां होतास मायबाप ।
हरी आतां मग कोण पाप-ताप ॥

६

काय कंटाळा सांइ ! तुला आला ? ।
कुण्या बाळें अपराध कांहिं केला ।

म्हणुनि कोपुनि तूं समाधिस्थ होशी ?
दीन भक्तां परि कोण जगीं पोशी ? ॥

७

मधुर मधुसे तव शब्द फिरोनीयां ।
श्रवणरंध्रीं पडतील काय ? राया !
व्यर्थ दुःखातें करुनि लाभ काय ? ।
करिशि जेंवी तूं तेंचि सत्य होय ॥

८

विजय दशमी नी ईद* जवळ जवळी ।
पर्व ऐसा पाहोनि याच वेळीं ।
देह सोडुनि गेलास काय ? सांइ ! ।
हिंदु-मुस्लिम साम्यता तुझे ठाईं ॥

९

शुक्ल दशमी जी येत-आश्विनांत ।
करित सीमोल्लंघना हिंदु जात ।
प्रेम हिंदूंचें अढळ ठेवण्यास ।
जासि सीमोल्लंघना करायास ॥

१०

मृत्यु येणें बहु पुण्य या दिसांत ।
असें इस्लामी लोक बोलतात ।
तयां लोकां संतुष्ट ठेवण्याला ।
खचित घेशी कां नित्य समाधीला ? ॥

११

स्थूल देहा टाकोनि गुप्त होशी ।
तरी आम्हीं सोडूं न तव पदांसी ! ।
पितापुत्रां संबंध तुटे काय ? ।
" दत्तकिंकर " तव पदीं लीन होय ॥

संतदास
" दत्तकिंकर-कंधारकर-नांदेड "

---

* मोहरमचा दिवस ( विजया दशमी आणि मोहरमचे हिंदुमुसलमानांचे सण जवळ आले हें पाहून; हा भावार्थ )

## ( उद्धवेश-बुवाकृत पद )

चालः—आनंद कन्द ऐसा हा हिंद देश माझा.

नामें तुझ्याच साई । गुणकर्म दूर होई ॥
कलिकाळ भीति जाई । ऐसेंच नाम गोड ॥ ध्रु० ॥ १ ॥
उपमा तुला कशाची । द्यायास जाण साची ॥
हें गूढ ना कळेची । उकलूनि तूंच द्यावी ॥ २ ॥
माता पिता म्हणावें । जन्मीं ते येच जावे ।
पुनरपि दुजे पहावें । सृष्टीचि मालिका ही ॥ ३ ॥
कुलदैवता परि जैसा । तुजला मी मानूं कैसा ॥
कुलधर्म[1] जैसा जैसा । तैसेंचि अर्चिताति ॥ ४ ॥
देवासमान मानूं । देवांसि देवपणू ॥
तव योगें हाचि मानूं । दैवत्व त्यांसी येई ॥ ५ ॥
ब्रह्मा समान जरि हो । जोखोनि पूर्ण पाहों ॥
ब्रह्मासि ब्रह्मपण हो । तुमचेनि वाणि येई ॥ ६ ॥
वाणी अखेर वदली । अपद्राच सत्य गेली ॥
गुरु सांईराज वाली । सर्वांसि तूंचि होई ॥ ७ ॥
यालागिं गुरू गरीमा । छाया नसेचि उपमा ॥
कुंठीत होइ शामा । बोलासि वाव नाहीं ॥ ८ ॥
नामें तुझ्याच सांई । गुणकर्म दूर होई ॥ ध्रु० ॥

---

१ प्रकृति धर्म.

पद—गज्जल—चाल—" आनंद कंद जैसा "

सांई तुझ्याचि संगा। चिंती दिवानिशीं मी ॥ धृ० ॥
व्हावें सुलीन पायीं।
करि पूर्ण हीच आशा।
गोदावरी तटाकीं। नित जो उभाचि राहे ॥ १ ॥
त्वद्वाक्सुधाचि यानें।
भवसिंधु तारि[1] विकटा।
सांई तुझाचि महिमा। गाऊं कितीक आतां ॥ २ ॥
ब्रह्मासि[2] जें न शक्य।
तें काय म्यांचि गावें।
देई मुखेन आशी[3]। जोडीन पुण्यराशी ॥ ३ ॥

ठाणें १०–९–२५ श्रीनिवास बालकृष्ण देव

## श्रीसांईनाथ महाराजकी जय

### भुजंगप्रयात.

परब्रह्म निर्गुण साकार झाला। जगीं बोलती सर्वही देव त्याला।
वसे शेरडी जाहला ग्रामवासी। नमस्कार त्या सद्गुरूच्या पदाशीं ॥ १ ॥
चला पाहुं ते शेरडी ग्रामकाशी। तिथें नांदतो सद्गुरू पुण्यराशी।
तया दर्शनें पातकें सर्व जाती। नमस्कार माझा तया साधु मूर्ती ॥ २ ॥

### शिखरिणी

नसे ठावा मातें तुजविण प्रभो देव दुसरा।
जगामध्यें कोणी तुजविण नसे अन्य असरा।
असे माझ्या चित्तीं शिव अणिक तूं एक दिसला।
त्यजोनी कैलासा शिरडीमधिं येऊनि बसला ॥ ३ ॥

### कामदा

ग्राम शेरडी साधु तो खरा। भासतो जगीं कबिर दूसरा।
सांइ नाम हे लोक बोलती। परि असे खरा तो रमापती ॥ ४ ॥

### उपजाति

रामा रहीमा जगिं एक आहे। अल्ला इलाई तरि तोच पाहे।
हरीहरातें मग भेद नाहीं। एकाच दृष्टी जगतास पाही ॥ ५ ॥

१ तारूं २ ब्रह्मदेवाला ३ आशिर्वाद.

### इंद्रवज्रा

हे शिरडीचे सिद्ध साईनाथा । कैसी तरूं मी भवसिंधु आतां ।
आपुली नौका मज देवराया । न्यावी भवाब्धींतुनि उतराया ॥ ६ ॥

### अभंग

साई बाबा माझा देव । तोच माझा पंढरीराव ।
तोचि माझा हस्तीमुख । सिद्धिबुद्धीचा नायक ॥ ७ ॥
तोच माझा शंकर भोळा । भस्म उटी रुंड माळा ।
तोच माझा माता पिता । चरणिं मस्तक साईनाथा ॥ ८ ॥
तूंच माझा मोक्ष गुरू । तूंच माय मी लेंकरूं ।
सुख दुःख सांगू कोणा । तुझ्यावांचुनि नारायणा ॥ ९ ॥
तुजवांचुनि नाहीं कोणी । तूंच माझा शूलपाणी ।
चित्त लागो तुमच्या पायीं । आवडीनें पदरीं घेई ॥ १० ॥
आमची मिरास शेरडी । आम्ही राहूं गोदाथडी ।
साईबाबा आमुचा पिता । साईराजा आमुची माता ॥ ११ ॥
बंधु आमुचा नारायण । मोहनाबाई ते बहीण ।
ऐशा घरीं जन्म झाला । भव करील काय माला ॥ १२ ॥

### आर्या

नित्य तुझें नाम मुखीं ठेवि कृपादृष्टि तूं उमानाथा ।
बाळक तान्हें जैसें प्रेमानें अंकिं घेतसे माता ॥ १३ ॥
“कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने” असें वाचें ।
निश्चय करुनी जो नर वदतो तो नर भवांबुधीं वांचे ॥ १४ ॥

### साकी

साईनाथा चरणीं माथा ठेवीं येतां जातां ।
दया करावी दीनावरती विनती मम ही आतां ।
उचटुनि पाप मुळीं । उदि लावावी भाळी ॥ १५ ॥

### भुजंगप्रयात

नको राज्य माला नको स्वर्ग माला ।
नको पुत्र माला नको त्या गृहाला ।
नको तीर्थ काशी नको द्रव्यराशी ।
मना लीन होई गुरूच्या पदाशीं ॥ १६ ॥

पार्वतीबाई आंझरकर व आवडूताई देव.

## श्री संस्थान शिर्डी येथील शके १८४७ चे गुरुपौर्णिमेच्या उत्सवाचा हिशेब.

जमा.

६८॥ श्रीसमर्थांचे पेटींत उत्सवाचे दिवसांत पडलेली रक्कम

२५९८- किरकोळ वर्गणी

४५७।.। श्री० केशवराव गोपाळराव बुटी व बंधु यांची रक्कम

७८४॥।-।-

नांवें

३४।=। पूजा खर्च

१। अभिषेक

२०। गलेफ निशाण वगैरे

२ कमाळखानी हार

१०॥।=। दक्षिणा वगैरे

३४।=।

६५९॥≡॥। भोजन खर्च

५००।≡॥। समारंभास आलेल्या गांवचे व बाहेर गांवचे मंडळी-प्रीत्यर्थ

९९८≡ आचाऱ्यांचा पगार व खर्च

९९।-॥ तांदूळ,डाळ,कणीक

२२३८≡॥ किराणा माल ( तूप, साखर, रवा, तेल, चहा, केशर, वगैरे )

७८॥≡॥। दूध, पत्रावळी, शाक भाजी, सर्पण मजुरी वगैरे

५००।≡॥।

१५९।- भंडारा खर्च

६५९॥≡॥।-

९०॥≥। चिल्लर खर्च

२४ वाजंत्री

९ आतषबाजी

१२॥≥॥ रोषनाई

३१।-॥. प्रसादाच्या पिशव्या व पोष्टेज वगैरे

१९।= निमंत्रण पत्रिकांचा पोस्टेज

१८Ո॥ किरकोळ पोष्टेज

-|||- प्रसादाच्या पिशव्या व लेबल्सचा खर्च

१०८= प्रसाद पाठविण्यास तिकिटें व प्रसाद तयार करण्यास खर्च

१० खैरात

३॥≥ किरकोळ

---

९०॥≥।

---

७८४॥-।-

## साभार स्वीकार व अभिप्राय.

" मठगांवचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत राजवंश "—लेखक श्रीयुत वासुदेव अनंत बांबर्डेकर, कि. रु. २. विषय ऐतिहासिक आहे व भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत-ग्रंथमालेपैकीं हा ग्रंथ आहे. एवढ्यावरूनच या ग्रंथाचा ऐतिहासिक वाङ्मयांत किती उच्च दर्जा आहे हें कळून येईल. ग्रंथकर्त्यानें फार परिश्रम घेऊन ऐतिहासिक जुने कागदपत्र, शिलालेख, शिक्के यांचें परिशीलन करून कित्येक वादग्रस्त मुद्यासंबंधी सोपपत्तिक व साधार माहिती प्रसिद्ध केली आहे. एकेकाळीं दक्षिण कोंकण प्रांतावर कुडाळदेशकर या नांवानें प्रसिद्ध असलेल्या आद्य गौड ब्राह्मण सामंत राजे यांची बरीच शतकें पूर्ण सत्ता होती व हल्लींचे सावंतवाडी संस्थानाधिपति यांचे पूर्वज सावंत भोसले व कुडाळदेशकर ब्राह्मण सामंत राजे यांची नाम-सादृश्यामुळें झालेली गुंतागुंत सोडविणें हे भाग प्रामुख्यानें साधार प्रतिपादन केले आहेत. विषय ऐतिहासिक असल्यामुळें वरील दिग्दर्शनापलीकडे परीक्षण करण्याचें श्रीसांईलीला हें स्थळ नव्हें म्हणून श्रीयुत बांबर्डेकर यांचें अभिनंदन करण्यापलीकडे आम्हास जातां येत नाहीं. पुस्तकाचें अंत-रंग व बहिरंग सारखेंच मनोहर आहे. श्रीयुत बांबर्डेकरांचें मराठी भाषेवर चांगलें प्रभुत्व आहे. सत्य शोधून काढण्याची त्यांची चिकाटी प्रशंसनीय आहे.

(१) श्रीतुकाराम महाराज येहळेगांवकर यांचें चरित्र व (२) श्री शारदा-स्तोत्र-लेखक श्री. दत्तात्रय अनंत सराफ, कंधारकर, मु. नांदेड (निजामशाही). श्रीतुकाराम महाराज हें नांव ऐकल्याबरोबर महाराष्ट्रीय मंडळीच्या पुढें देहूचे श्रीविठ्ठल भक्त तुकाराम महाराज यांचीच मूर्ति उभी राहील. त्यांच्याच तोडीचे तुकाराम महाराज या नांवाचे एक महान् सत्पुरुष मोगलाईंत सुमारें ३८ वर्षांपूर्वी होऊन गेले, त्यांचें हें लहानसें चरित्र आहे. येहळेगांवकर तुकाराम महाराज यांचा जन्म एका ब्राह्मण सत्कुळांत झाला. हे जन्मताच संत होते. शिशुपणांत सुद्धां यांनीं अलौकिक चमत्कार केले. हेही

पांडुरंग भक्त होते. प्रत्यक्ष श्रीपांडुरंग वेळोवेळी प्रगट होऊन यांस सहाय करीत असत. हे विदेही होते. वस्त्रप्रावर्णावांचून गांवोगांव भटकणें, वाटेल त्या जातीच्या आपल्या कोणत्याही शिष्याकडे अन्नग्रहण करणें वगैरे त्यांच्या आचरणामुळे कांहीं काळ लोक यांना भ्रमिष्ट म्हणत असत व इतर साधु-संताप्रमाणें ब्रह्मवृंदाकडून यांचा पुष्कळ छळ झाला. परंतु त्यांच्या अलौकिक सामर्थ्यामुळें कालांतरानें तोच ब्रह्मवृंद यांच्या भजनीं लागला. त्यांची समाधि येहळेगांव मुक्कामीं आहे. तेथें रोज पूजाअर्चाहि चालते. पुण्यतिथीनिमित्त तीन दिवस मोठी जत्रा भरते. ह्यांची नवसास पावण्याबद्दल त्या प्रांतांत फार प्रसिद्धि आहे त्यामुळें नित्य व यात्रेंचे दिवसांत हजारों लोक नवसाची फेड करीत असतात, व त्यावर सर्व खर्च चालतो.

श्रीयुत सराफ यांनीं चरित्र हृदयंगम केलें आहे. भाषा विषयाला शोभेल अशी आहे व मांडणी चांगली साधली आहे. मात्र पुस्तकाचा संकुचितपणा हा त्याचा मोठा दोष आहे. अशा तऱ्हेचीं चरित्रें विस्तृत लिहिलीं गेलीं पाहिजेत. स्वल्प कां होईना परन्तु त्यायोगें या सम्पुरुषाचं जनतेला आठवण राहण्यास हें एक साधन होईल यांत शंका नाही.

श्री शारदा स्तोत्र—हें ५२ ओव्यांचें लहानसें स्तोत्र खास हिंदुधर्मीय विद्यार्थ्यांकरितां रचिलें आहे. ओव्या सुगम व प्रेमळ आहेत. विद्यार्थ्यांनीं त्याचा उपयोग केल्यास श्री शारदादेवी त्यांची मदतगार होईल.

बाल सन्मार्ग-दीपिका. लेखक वासुदेव जनार्दन सिद्धये, सोमण बिल्डिंग ३२ चर्नीरोड गिरगांव, मुंबई. किं. ।-. नावांवरूनच पुस्तकांतील विषयांची कल्पना होईल. पहिल्या भागांत लहान मुलांना शिकवावयाचें प्रातःस्मरण, भूपाळी, द्वादश नमस्कार, निरनिराळ्या देवांचीं स्तोत्रें वगैरे विषय दिले आहेत. कांहीं संस्कृत श्लोकांचा भावार्थ खालीं टिपेंत मराठींत दिल्यामुळें आपण तोंडानें काय म्हणतों याची मुलांना चांगली कल्पना येईल. पूर्वीच्या पिढींत ब्राह्मण घराण्यांत हे विषय मुलांना त्यांचे आईबाप शिकवीत असत. हल्ली काळ बदलल्यामुळें धार्मिक शिथिलता आली आहे हें चांगलें लक्षण खास नव्हे. आपलीं मुलें सन्मार्गवर्ती निपजावी. अशी

इच्छा करणाऱ्या प्रत्येक आईबापानें या पुस्तकाची एक प्रत आपल्या मुलांना नजर करून त्यांतील पाठ त्यांचे कडून करवून घ्यावेत अशी आमची शिफा-रस आहे. दुसऱ्या भागांत बरीचशी उपयुक्त माहिती दिली आहे. ती तरु-नांनी व मोठ्यानीही मनन करण्यासारखी आहे. जुनी बायकांची गाणी शेवटीं दिलीं आहेत त्यांतील कांहीं फार प्रेमळ आहेत.

### श्री दत्त ज्ञान साइ राजायनमः

रा. रा. श्री साईलीलाकर्ते यांस.

सा. न. वि. वि. मागील खेपेस वचन दिल्याप्रमाणें बाबांचा सुंदर लीलानुभव आपलेकडे पाठवीत आहें. त्यास आपल्या श्री साईलीलेच्या एखादे सन्मान्य अंकीं जागा कृपेनें द्यावी अशी सविनय प्रार्थना आहे.

मागें लिहिल्याप्रमाणें मी माझे परम मित्र जनुभाऊ करंदीकर व निकावलीचा कावजी पाटील असें आम्ही तिघेजण बाबांच्या प्रथम दर्शनास गेलों. रा. रा. माधवराव देशपांडे यांस बरोबर घेऊन मशीदींत गेलों; व उभे राहिलों. पुष्कळ मंडळी जमलेली होती. सकाळचा १०–११ वाज-ण्याचा सुमार होता. माधवराव श्रीजवळ बसले. श्रींनीं आम्हाकडे पाहून आम्ही कोण म्हणून माधवरावास विचारलें. माधवरावांनीं माहिती सांगितली. नंतर श्री मजकडें पाहून म्हणालें कीं "२५ रुपयांची तक्रार आहे. लई सांगितलें कीं दे २५ रुपये पण नाहीं ऐकत. देईल दोन चार महिन्यांनी." ही गोष्ट मी विचारण्याकरितां गेलों नव्हतों हें पूर्वेतिहासावरून कळेलच. परंतु प्रथम दर्शनींच श्रींनीं ही जी गोष्ट सांगितली तिचें सत्यत्व मला पूर्ण-पणें पटलें व श्रीच्या बोलण्याप्रमाणें २–४ महिन्यांत तसा योगही आला. शेकडों मंडळी बसली असतां कोणांच्याही गुह्याचा उघडपणें स्फोट न होतां ज्याची खूण त्यासच कळावी व श्रीच्या सर्वसाक्षित्वाचा व अलौकिक ज्ञानाचा त्यास त्याचें अंतर्यामींच अनुभव पटावा ही बाबांचे बोलण्यांत एक विलक्षण व कौतुकास्पद भजन शैली होती. महाराज काय बोलले ह्याचा उलगडा इत-रांस न झाल्यामुळें बाबा कित्येक वेळा, नव्हे पुष्कळवेळा, कांहींतरी बोलतात त्यांच्या बोलण्यांत कांही मेळ नसतो असा त्यांचेवर मंडळी आरोप करीत.

परंतु हा आरोप किती फोल व अज्ञानमूलक आहे हें वरील व खाली मी देत असलेल्या दुसरे अनुभवावरून लक्षांत येईल. बाबांचे चरित्र-महात्म्याकरितां भजन करण्याचें कोणा भक्ताचें सद्भाग्य असल्यास व तसा दिव्य सुदिन एखादे काळी उगवल्यास महाराजांवर असलेल्या इतर आरोपां-प्रमाणें याही आरोपाबद्दल पुष्कळच लिहितां येईल. असो. बाबा वर लिहिल्या-प्रमाणें बोलल्यानंतर त्यांनी आम्हांस खाली बसावयास सांगितलें. श्री आज्ञे-प्रमाणें आम्ही तिघेजण खाली बसलों व पूर्वसंकेताप्रमाणें श्रीचरणी मी एक रुपया ठेवून चरणवंदन केलें. श्री मला म्हणाले, “तूं मला आणखी दोन रुपये दे.” मी त्याप्रमाणें आणखी दोन रुपये दिले. नंतर जनुभाऊंनी श्रीचरणी एक रुपया अर्पण करून वंदन केलें. श्री जनुभाऊंस म्हणाले, “तूं मला आणखी एक रुपया दे.” जनुभाऊंनीं त्याप्रमाणें श्रीस आणखी एक रुपया दिला. नंतर (कावजी पाटील) बुवानें एक रुपया श्रीचे पुढें ठेवून श्रीचर-णांचें वंदन केलें, श्रींनीं त्याचे जवळ आणखी कांहीं मागितलें नाहीं. उलट “तूं पलिकडे बैस,” असें त्यास सांगितलें. इतकें झाल्यानंतर आम्हां तिघांस उदी देऊन वाड्यांत जाण्याची आज्ञा झाली. श्रीचे आज्ञेप्रमाणें आम्ही जेथें उतरलों होतों त्या साठेसाहेबांचे (हल्लीं नवलकर साहेबांच्या) वाड्यांत गेलों. जेवण झाल्यावर आम्ही तिघेजण पुन्हां श्री दर्शनास मशीदींत गेलों व बसलों. “स्थितप्रज्ञस्य का भाषा” “अमानित्वं अदंभित्वं” “गुणातीतः स उच्यते” वगैरे श्री गीतेमध्यें जी संताबद्दलचीं लक्षणें दिलीं आहेत त्याप्रमाणें येथें कशी स्थिति आहे हें मी मनांतले मनांत पहात बसलों. पूर्वी कधीही सत्पुरुषदर्शन नाहीं, सत्पुरुषसंगती नाहीं सत्पुरुषांच्या मुखकमलोद्भव ज्ञान गंगामृताचें पान मिळण्याचा अगर नुसता स्पर्श सुद्धां होण्याचा प्रसंग आलेला नाहीं. त्यामुळें येथें आपण काय पहावें, श्रीस कसें व काय विचारावें. सर्व मंडळी श्रीस वाटेल ते सांसारिक नित्य जीवनक्रमांतीलही शेंकडो प्रश्न विचारीत. व महा-राज सर्वांस त्यांच्या प्रश्नांचें जबाबही देत. परंतु त्या परब्रह्ममूर्तीस आपण विचार व विवेक दरिद्री यःकश्चित् कीटकानें काय विचारावें असें मनांत येऊन बाबांस कांहींही विचारण्याचें धैर्य होईना. भिती वाटे. तत्त्वार विषयक

तर कांहीं विचारावयाचें नाहीं व मागावयाचें नाहीं असें तर प्रथमपासूनच ठरविलें होतें. विचारण्याची हिंमतच झाली तर निरंतर सत्संगती कशी मिळेल व मनास शांति व समाधान कसें राहील येवढेंच विचारावयाचें. बाबा पुष्कळांशी गोष्टी बोलत पण त्यावेळीं आम्हांस त्या सर्व विसंगतच वाटत. व संतांच्या वाक्सरस्वतीची बिल्कूल ओळख नसल्यामुळें कित्येक वेळां तर बाबांचे बोलणें आम्हांस अश्लीलही वाटे. तथापि बाबांच्या एकंदर वर्तनावरून दररोजच्या कार्यक्रमावरून व अंतर्यामीं स्थिर परंतु क्षणोक्षणीं पालटणाऱ्या असें वरवर दिसणाऱ्या चित्तवृत्तीवरून व पूर्णपणें षड्रिपुदमनावरून बाबांची भाषा नाथांच्या खुणेप्रमाणें उलटी आहे, बाबा हे पूर्ण सगुण ब्रह्म ज्ञानेश्वरावतार आहेत व स्वप्नांतील श्री दत्तगुरुमूर्ती ती खास हीच, असें वाटूं लागलें. त्या दिवशीं दुपारचे दर्शनानंतर आम्ही तिघे बाहेर फिरावयास गेलों व श्रीबद्दल गोष्टी बोलूं लागलों. अनंत जन्माच्या दुष्ट वासनेनें, दुष्ट संगतीनें व दुष्ट विचारानें बाष्कळ झालेलें मन न स्थिरावतां द्विधा होऊं लागे. मला येथें कांहीं अर्थ वाटत नाहीं. निवळ तुमच्या शब्दामुळें मी येथें आलों, माझे मनांतील गोष्ट सांगतील तर बाबा खरे साधु नाहीतर त्यांच्यांत कांही अर्थ नाहीं, मी स्वतः कांहीं विचारणार नाहीं. बाबांनीं होऊनच स्वतः माझे मनांतील गोष्ट सांगितली पाहिजे.असें बीवा म्हणूं लागला. "बाबा साधुपुरुष आहेत. तथापि एका जवळून तीन रुपये एका जवळून दोन रुपये व एका जवळून फक्त एकच रुपया कां घ्यावा ? तसेंच एकास जवळ बैस व दुसऱ्यास दूर बैस असें कां म्हणावें ? ही समदृष्टी कोठली ?" असे उद्‌गार जनुभाऊ काढीत. मी म्हणें "आपण आजच येथें आलों. सत्पुरुष म्हणजे काय यांची खरी माहिती आपणांस मुळींच नाहीं. त्यांचीं लक्षणें काय ते कसे ओळखावे याचें ज्ञान व लायकी आपले जवळ नाहीं. दिसण्यांत जरी कांहीं गोष्टींत विसंगतता दिसते तरी सत्पुरुषांबद्दल व विशेषतः बाबांबद्दल विरुद्ध चर्चा करण्याची आपण घाई करूं नये. माझेंही मन व्यग्र होई परंतु स्वप्नांत पाहिलेली श्री दत्तगुरुची तीच ही मूर्ती आहे अशी पक्की खात्री होत असल्यामुळें व प्रथमदर्शनीं २५ रु. च्या गोष्टीच्या अनुभवामुळें मन पुन्हां उल्ह-

आहे, व बाबांबद्दल उलट बोलणें महापातक आहे असेंही वाटे." दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही स्नान करून फिरून श्रींचे दर्शनास गेलों. व श्रीपुढें उभे राहिलो. कै. तात्यासाहेब नूलकर आमच्याबरोबर होते. ते श्रींजवळ बसले. मी त्यांच्या समोर उभा राहिलों. श्रींनीं तात्यासाहेबांस पुन्हां विचारलें, "हे कोण?" त्यांनी मी अमुक म्हणून सांगितलें. नंतर श्री म्हणाले "मोठे लोक आहेत. पांच पंचवीस रुपये देऊन जावें. पण नाहीं देणार. जाऊं द्या. त्यास बसा म्हणावें." त्याप्रमाणें तात्यासाहेबांनीं मला बसावयास सांगितलें. मी बसलों. जवळ बसलों. व श्रींचे पाय चेपूं लागलों. जनुभाऊ व बुवाही खालीं बसले. सुमारें अर्धे तासानें बाबा मला म्हणाले, "तूं सच्चा, आणखी ६ रुपये दे." मी म्हणालों 'होय, देतों.' वाड्यांतून आणून द्या असें मी जनुभाऊस म्हटलें. जनुभाऊ वाड्यांत गेले. जरा वेळ लागला. इतक्यांत बाबा पुन्हा म्हणाले, "दे, दे, लवकर दे." मी म्हणालों, जनुभाऊ वाड्यांत गेले आहेत ते आतां येतील." श्री म्हणाले, "तूं जा, व लवकर घेऊन ये." मी गेलो. नोटा होत्या. रोख रुपये नव्हते. व नोटांचे रुपयेही मिळेनात. नंतर मी ५ रुपयांची एक नोट व एक रुपया रोख असे ६ रुपये घेऊन गेलों व ते श्रीचरणीं अर्पण करून वंदन केलें. माधवराव देशपांडे म्हणाले, "बाबा नोट घ्यावयाची नाहीं ना?" बाबा म्हणाले, "घे, घे, असूं दे," नंतर माधवरावांनीं त्या नोटीचे रुपये करून आणून मजजवळ दिले व गुरुजीस घ्याव-यास सांगितलें.मी तसें केलें. नंतर तात्यासाहेब नूलकर मला म्हणाले, "सर्व मंडळी श्रींची पूजा करीत आहेत, तुम्हीही करा." मी म्हणालों, "मी पूजेचें सामान आणिलें नाहीं." ते म्हणाले, "माझ्या तबकडींत गंध, अक्षता व फुलें आहेत ती घेऊन तुम्ही सद्गुरूंची पूजा करा." मी पूजा करण्यास पुढें झालों. इतक्यांत बाबा म्हणाले "कायरे करतोस?" मी म्हणालों पूजा करतों. श्री म्हणाले "अरे तुझी पूजा झाली, तुजपासून दक्षणाही घेतली. असतां कसली पूजा करतोस?" मी पूजा न करतां तसाच मागें सरलों. श्रींची आरती नैवेद्य वगैरे झाल्यावर आम्ही घरीं आलों. श्रींनीं जनुभाऊजवळ अगर बुवाजवळ दक्षणा मागितली नाहीं. आतां आपल्यास बरेच दिवसांनीं जाव-

याचें आहे करितां आज बाबांची आज्ञा घेऊं. असें म्हणून आम्ही तिघेजण सायंकाळीं श्रीचें दर्शनास गेलों. आम्हास पाहिल्याबरोबर प्रथम बाबाच आम्हास म्हणाले, " कां जावयाचें कां ?" जनुभाऊ म्हणाले, "आपली परवानगी असल्यास जावयाचें." बाबा म्हणाले, "बरें उद्यां सकाळीं जा." नंतर दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही पुन्हां श्रीची आज्ञा घेण्यास मशिदीत गेलों. आम्हांस पाहतांच बाबा पुन्हां म्हणाले, " कां जाणार कां ?" आम्ही दोघे मी व जनुभाऊ म्हणालों, " आपली आज्ञा असेल तर जाऊं.' श्री म्हणाले, " जा." नंतर श्रींनीं आमचे तिघांचे कपाळी उदी लाविली. आम्ही मग पारनेरास गेलों. श्री कुलकर्णी महाराजांचें तेथें दर्शन घेतलें. नंतर नगरास आलों व तेथून केडगांवीं गेलों; परंतु श्री सद्गुरु नारायण महाराज मुंबईस आहेत असें कळलें म्हणून पुण्यास उतरून श्री पर्वती देवीचें दर्शन करून श्री आळंदीस जाऊन श्री इंद्रायणी माईचें स्थान, श्री समर्थ सच्चिदानंद सद्गुरु संत शिरोरत्न ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचें पुण्य दर्शन, पूजा, देव-ब्राह्मण वगैरे करून श्री कवाड क्षेत्रीं श्री समर्थ सद्‌गुरु सखाराम महाराज यांचे पुण्य समाधीचें पवित्र दर्शन करून मुंबईस श्री समर्थ नारायण महाराजांचें दर्शन करून त्यांचे आज्ञेप्रमाणें त्यांचे तेथें म्हणजे अंजनीबाईंचे बंगल्यांत काशीकर बुवाचें कीर्तन रात्रीं श्रवण करून दुसरे दिवशीं डहाणूस आम्ही सर्व परत गेलों. ज्या अलकापुरीचें दर्शन मनांत उत्कटेच्छा असतांना बहुतकाल होत नव्हतें तें व इतर पवित्र क्षेत्रांचें व पुण्य साधुसंतांचे व दिव्य समाधींचें दर्शन प्रत्यक्ष श्री दत्त ज्ञानेश्वरावतार जे बाबा त्यांचे मधुर दर्शन झाल्याबरोबर कसें झालें, ही गोष्ट वरील हकीकतीवरून कळेल.

आतां निकावलीच्या बुवाचें व माझें प्रथम डहाणूस काय बोलणें झालें, आमच्याबरोबर श्री शिरडीस येतांना त्यानें महाराजांबद्दल काय काय भाषणें केली व नंतर आम्ही तिघेही शिरडीस गेल्यावर अंतरसाक्षी श्रीची वागणूक त्याचे संबंधानें कशी व कां होती, प्रत्येकवेळीं बुवास महाराजांबद्दल कसा राग येत असे, तो त्यांचे संबंधानें काय उद्गार काढी, कसा तापे, महाराजांच्या साधुत्वाची परीक्षा तो कोणत्या दृष्टीनें व कोठल्या अटी-

वर करीत होता, पुढें तेथें असलेल्या आमचे तीनच दिवसांचे मुक्कामांत आम्ही तिघेजण बाबांचे जवळ एके सकाळीं मशिदींत बसलों असतां त्यांचेंच इच्छेप्रमाणें त्याचे मनांतील गोष्ट तेथें बसलेल्या मंडळींपैकीं एकास नेहमी-प्रमाणें प्रश्न करून त्याचे मुखांतून सर्वांसमक्ष कशी काढून घेतली, नंतर त्या संबंधानें स्वतः कसे हावभाव केले, नंतर त्या ओघावरून नानासाहेब देश-पांडे यांनीं श्रीस बुवाबद्दल कसे प्रश्न केले, बाबांनी त्यास कशीं उत्तरें दिलीं, इतक्याही गोष्टी घडून बुवाच्या मनाचें समाधान कसें झालें नाहीं, व बुवानें बाबांच्या सांगण्याविरूद्ध वागण्याचें मनांत आणिल्यामुळें त्यास कशी अद्दल घडली व त्याचा त्यास कसा अनुभव आला, बाबांबद्दल श्री संन्यस्त नारायण महाराजांनीं आम्हांस काय सांगितलें वगैरे हकीकत फारच रम्य आहे, पण स्थलसंकोचास्तव पुढील खेपेस ती देण्याचें योजिलें आहे.

वर लिहिल्याप्रमाणें इतकाही प्रत्यक्ष कटुतम अनुभव आला तरी खऱ्या संतांची परीक्षा व त्यांच्या दिव्य लीलेचें व अनुभवाचें श्रेष्ठत्व कळत नाहीं. मन निरंतर प्रपंच व्यवसायांतच गुंग. अनंत जन्माच्या अनंत संस्कारामुळें दुष्ट संचयी व दुष्ट खोडींचे बंदे गुलाम. आत्मघातकी वासनांना बळी पड-लेलें. सदा व्यथित व मुग्ध–प्रफुल्लितपणाचा व प्रसन्नतेचा नेहमी अभाव. षड्विकारांस नित्य विकलेलें. आत्मानात्म विचार व विवेक यांची फारकत– म्हणूनच गुरुचरणीं लीन होत नाहीं. गुरुवचनावर दृढ विश्वास रहात नाहीं. ह्या सर्व भयंकर पातक-निधीचें निर्दालन त्या सुरनरसंत चक्रवर्ती श्री सद्गुरु साईबाबांच्या कृपेवाचून होणार नाहीं. त्या परम कारुणिक भक्तवत्सल श्री चरणीं खालील एकविंशति बाळदुर्वांकुरांची जुडी अनन्यभावें अर्पण करून आपली रजा घेतों.

## पृथ्वीवृत्त

क. न कोण मज मी कळे, परम तत्त्व ना आकळे।
विकल्प बहु थोकळे, मन गुहें मध्या मोकळें।
भवीं भ्रमत दुष्कळें[1] चतुर जन्म-मृत्यु-कळें[2]।
न साइकरुणे विना दुरित सर्व हें निर्दळे ॥ १ ॥

दुखें उदर दुष्कळें[3] मन तयें दुखें चित्कळें[4]।
पिशाच सम किंकळें बनवि मोह त्या ठोकळें।
प्रफुल्ल न, जसे कळे[5] सतत संशयें शांकळें।
न साइकरुणें विना दुरित सर्व हें निर्दळें ॥ २ ॥

ख. न मोह मद कीं खळे[6] अशुभ जेंवि चंद्रा खळें[7]।
मला तुडविलें खळें[8] महिष जेंवि मर्दी खळें[9]।
न होत मति-मेखळें[10] स्थिर, सुबद्ध, चित्तं खळे।
न साइकरुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ ३ ॥

ग. अहंकृति न ती गळे विशद सन्मती डागळे।
विकार लघु डोंगळे तम[11] मधू पिती आगळे।
डसूनि तिस[12] पांगळे करित निश्चया वेगळे।
न साइकरुणेविना [13]दुरित सर्व हें निर्दळें ॥ ४ ॥

घ. न दुष्ट भ्रम [14]ओघळे, विषय वासना पाघळे।
च. सुमार्गीं मन ठेंचळें, प्रभुपदावरूनी चळे।

---

१ दुष्ट कला २ पुनर्जन्म घेण्याची कला ३ दुष्ट कळ ४ ज्ञानकला ५ फुलाच्या कळ्या ६ कमी होत नाहीं ७ वर्तुळाकार खळं पडतें तें ८ दुष्टानें ९ धान्याचें खळें १० पट्टा-दोरी. ११ अज्ञान १२ सद्सद्विवेकबुद्धि १३ पातक १४ कमी होणें.

मिलाप-अहि आंचळे काहि, शांति गो निजळे ।
न साइकरुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ ५ ॥

छ. जसा ग्रेह विधूरळे, भवविलास भातें छळे ।
ज. न दीप हार्द पाजळे, बुद्धवि मोह भाषा जळे ।
न लोभ स्तुनी उळे, पदव रंगवी कौजळें ।
न साइकरुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ ६ ॥

ट. न कर्मगति ही टळे, न विरमे, स्थिरे, [६]नाळळें ।
ठ. ड. कदापि नच [७]चांळ्ळें, फिरवि सर्व दिग्मंडळें ।
ढ. सुनिग्रह सदा ढळे । सुगम पंथ ना आढळे ।
न साइकरुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ ७ ॥

त. न क्रोधगज शीवळें फिरवितो धरित्री तळें ।
थ. चिरी सुकृत-कोथळे इभि सवेग गंडस्थळें ।
द. विवेक-हरि[९] सादळे[१०] भ्रमबलानिळें[११] वादळें ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ ८ ॥

मनस्सरस[१२] रेंदळें चंड सरोर्मि त्या आदळे ।
ध. सुतप्त तनु मोधळे[१३] फुप्फुसें कीं जसे जोंधळे ।
स्मृतीसि करि आंधळे कुतल बुद्धिही गोंधळे ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ ९ ॥

---

१ स्तन. २ शांतिरूप गाय ३ दुग्ध. ४ आकाशस्थ चंद्र. ५ लोभामुळे तोंड काळें होतें. ६ टळत नाही. ७ वाद न सुटणें ८ शांत होणें. ९ विवेकरूपी सिंह. १० गर्जून होतो. ११ भ्रमरूपी पर्जन्य व वाऱ्याच्या वादळानें. १२ तलाव १३ कापणे.

न. जलांशि[1] वडवानळें[2] गिरिवरांसि[3] दावानळें[4] ।
तनूसि जठरानळें मज तसेंचि कामानळें[5] ।
प. गुरो छलितळें, पळें[6] पथि धनस्त्रिया सापळे ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ १० ॥

समायु[7] मृगि[8] चौपळे[9] मरण-व्याघ्र मागे पळे ?
मुहूर्त घटिका पळें हरुनि काढितो ढेंपळे ।
फ. न दैव अजुनी फळे मलिन जीव हा [10]फाफळें ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ ११ ॥

ब. [11]प्रमाद तुडवी बळें मृदु करी जसे कांबळें ।
प्रयत्न जरि ढोब[12]ळें न उठवेंचि बुद्धीबळें ।
करीत मन पाबळें[13] जरि उपंबळें तुंबळें[14] ।
न साइ करुणे विना दुरित सर्व हें निर्दळें ॥ १२ ॥

भ. सुरक्त[15] नव जांभळे, हरितपुष्ट[16] या नेभळें[17] ;
म. कुतर्क डिरु कोमळे, फुटति [18]हृद्रुमीं श्यामळे[19] ।
विरक्ति फल निर्मळें, नच दिसे मदाम्रामळें[20] ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ १३ ॥

र. कटुत्व कटुकारलें[21] कठिणता फळें नारळें ।
ल. न कृष्णपण कारळें[22] कधिहि सोडिले, कीं लळे ?
व. किती पुरविले, वळें[23] कधि न षड्रिपूंचे वळे[24] ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ १४ ॥

---

१ समुद्रास २ वडवानल अग्नी ३ मोठ्या पर्वताल ४ वणवा ५ वासनारूप अग्नी ६ जर वासनेच्या तडाख्यातून पळेन म्हटलें ७ आयुष्य ८ हरिणी ९ चारीपायांवर पळणें १० घाबरतो ११ उन्मत्तपणा १२ मोठे १३ दुर्बल १४ लढे. १५ लालभडक १६ हिरवे १७ दुर्बल १८ हृदयरूपी झाडाला. १९ काळे २० मदरूपी ढगाच्या मळाने २१ कडु कारले २२ काळे तीळ २३ समाधान किंवा तृप्ति होणें २४ वलय, कडे, संघ

स्वरादिरिपु सांवळे,[1] दिसत भावळे[2] जावळे ।
न दोंद कधि मावळे, फुगत लड्डु मोरावळे ।
कदा न कृश, बावळे शिरिं निबीड कीं जावळे ।
न साइ कळेविना दुरित सर्व हें निदंळे ॥ १५ ॥

सुनिर्दय न कोवळे, अति अतृप्त ना गोंवळे[3] ।
न स्वप्नि शुचि सोंवळे, भुजग घातकी ओंवळे[4] ।
सदा अहित चोंवळे, प्रखर दर्पना आंवळे ।
न साइ कळेविना दुरित सर्व हें निदंळे ॥ १६ ॥

श. दुरास नच ओशळे, सतत मानसीं कोसळे ।
स- न दुर्ग कधि ढांसळे, कधि न श्रांत ना फेंसळे ।
सवेग मनिं हेंसळें, शमवितां वरी ऊसळे ।
न साइ कळेविना दुरित सर्व हें निदंळें ॥ १७ ॥

ह. जसें सहज शांहळें, चिरित लीलया कोहळे ।
जसें अनल आहळे,[10] दहति मक्षिका मोहळें ।
चिरुनि मज, टेहळे[11], पुरवि आपुलें डोहळे ।
न साइ कळे विना दुरित सर्व हें निदंळें ॥ १८ ॥

तिला फुटति डाहळे, फुटति डाहळ्या याहळे ।
प्रकांड मग पोहळे[12] नच मरे तुटेना हळें[13] ।
पुनर्जनन सोहळे, चुकति ना तिच्या ओहळे[14] ।
न साइ कळेविना दुरित सर्व हें निदंळें ॥ १९ ॥

---

१ काळे दुष्ट २ जोडी. ६ मिळून तीन जोड्या एकेकवेळीं एकेक जोडी प्रघवलेली. ३ सुंदर सद्य ४ सदोष दुष्ट ५ बोख्वात ६ कमी होणें. ७ दुष्ट प्रापंचिक बाधा ८ दमलेली ९ फेंस आलेली पकलेली १० तापानें ११ चोरटें पाहणें १२ पसरतें १३ नांगरानें १४ दुराग्रांमी नाल्यांत पडल्यावर

दुराग्र भय शाकिणी सतत सज्ज झोंटी-पिळे ।
कधीं धरुनि पाडि गा मन असोच दुर्गा पिळे ।
शिरुनि मग अंतरीं हळुंच घेइ शस्त्रें पिळे ।
निमग्नं[1] तमिं, कापिते चरचरा मनाचे गळे ॥ २० ॥

वसूनि भवपादपीं विविध विकृती वागळे ।
अघोर भय काळजी-मळ चिरंजिती, चा गळे ।
ममोपरि सदा न, ये, किळस मन्मना नेमळे ।
विरक्त न च, डाग या जंव न कृपा इंगळें[3] ॥ २१ ॥

ठाणें १७-९-२५ बाबाचें बाळ

१ अज्ञानांत निमग्न असतां २ अडखळत नाहीं ३ अम्बीनें.

॥ श्री साईनाथ बाबा प्रसन्न ॥

सा. नमस्कार वि. वि. मागील अनुभव पाठविलेले पोहोंचलेच असतील. त्यापुढचा हा एक अनुभव पाठवित आहे; तो सवडीनुसार छापून प्रसिद्ध कराल अशी नम्र विनंती आहे. कळावें.

आपला एक दास व बाबांचा दासानुदास, हरिभाऊ बापुराव शिरसाटे.

॥ श्री साईनाथबाबाप्रसन्न ॥

१ गेल्या एप्रिल महिन्यांत कोल्हापुरचे रहाणारे माझे एक मित्र बी. ए. ची परीक्षा देण्यासाठी आले होते. त्यांस मी एका गुरुवारी गुरुमूर्ती रा. काशिनाथमामाच्या घरीं बाबांच्या भजनासाठीं मोठ्या आग्रहानें नेलें. भजनरंगीं आम्ही जसे सर्व मोठ्या प्रेमानें व आनंदानें भजन करूं लागलों, तसे तेही मोठ्या प्रेमानें बाबांचें भजन करूं लागले. भजना-नंतर काशिनाथमामास त्यांचा परिचय करून देऊन सांगितलें कीं, हे दोन वर्षें झटून अभ्यास करीत असतांनाही त्यांस परिक्षेंत यश येत नाही. यावेळीं मामा कांहीं बोलले नाहींत. नंतर दोन दिवसांनीं बाळोबाच्या घरीं वसंतपूजा असतांना ते पुन्हां भजनास आले. त्यावेळीं त्यांची भक्ती पाहून सावित्रीबाई तेंडुलकरांनीं आपल्या मुलास उद्देशून म्हटलेलें पद " कृपा करिल तुजवरी । श्रीहरी ॥ धृ० ॥ " इत्यादि मामांनीं म्हणून त्याच्या डोक्या-वर हात ठेऊन " बाबा तुला पूर्ण यश देतील. काळजी करूं नको " असें सांगून बाबांची एक ल्हान छबी व उदी देऊन सांगितलें कीं ' पेपर हातांत पडल्याबरोबर बाबांच्या छबीचें दर्शन घेऊन उदी लावून मग पेपर लिहा-वयास लागावें. ' एका पेपराचे वेळीं ते तसें करण्यास विसरले. पेपर लिहूं लागले तों त्यांस कांहीं न सुचून सर्व विचारांचा गोंधळ उडाला. ताबडतोब त्यांनी बाबांचें दर्शन घेऊन उदी लावून पेपर लिहिण्यास सुरुवात केली. तो पेपर "History Honours" चा होता. मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं, माझे मित्र मि. दळवी ह्यांची परिक्षा ऑनर्समध्यें उत्तीर्ण झाली. तेव्हांपासून ते बाबांची मनापासून भक्ति करूं लागले आहेत. त्यांनीं पुण्यास असतांना कांहीं पदें तयार करून बाबांच्या पुढें म्हटलीं, त्यांतलें एक मी खाली देत आहे. आपणांस योग्य वाटल्यास प्रसिद्ध करावें.

पद:—चाल–अवकाश नाहीं मज उरला । शरणागत सांई तुजला ॥ गुरुवरा ॥ धृ० ॥
भवतापें जीव हा श्रमला, घ्या पदरीं सांई मजला ॥ धृ० ॥
षड्रिपु छळती मज अती, नाहीं त्या मिती, न कथवे
मजला, म्हणूनियां लागे पायाला ॥ १ ॥ भवतापें ० ॥ धृ० ॥
ध्यानमार्गीं आड हे मांग, पाजती भांग, कोळुनी
विषयाला, निशा उतरा देउनी तीर्थाला ॥ २ ॥ भवतापें ॥ धृ० ॥
काय सांगू निशेची नवलाई, स्वरूप भान जाई,
भ्रमाचा घाला ज्ञानवल्ली योग्य विकाराला ॥ ३ ॥ भवतापें ॥ धृ० ॥
भवव्याधी सोसुं किती सांगा । दाह होत अंगा,
कंठ दाटला, कांहीं उपाय सांगा मजला ॥ ४ ॥ भवतापें ॥

शिरडीहून रा. रा. माधवराव बळवंत देशपांडे यांचे श्री. हरि सीताराम दीक्षित यांजला आलेल्या ता. १७।९।१० च्या पत्रांतील उतारा:—

(अ) श्री. समर्थ शरिरानें खुशाल आहेत. परंतु परवांचे दिवशी बुद्धया तिसरे प्रहरचे सुमारास विस्तवावर हात ठेविला. त्या योगानें हात सुजून हातास फापर पडलें आहे. दररोज मलम लावीत असतात. त्यांची लीला ते जाणोत. बाकी आपण असतांना होत होता तसा आनंद चालू आहे.

(ब) ता. ८।१०।१९१० च्या पत्रांतील उतारा:—

काल रोजीं म्हणजे ता. ७ शुक्रवारीं गणुदासाची बायको ताई इनें आपले वाडयाजवळील आडांत उडी घातली होती. आडास पाणी तीन चार पुरुष होतें परंतु कांहीं लागलें नाहीं. लागलीच मनुष्य उतरून तिजला बाहेर काढिलें, पुष्कळ लोक जमले होते. बिलकूल लागलें नाहीं.

(क) ता. ३०।१०।१९१० च्या पत्रांतील उतारा:—

विशेष इकडील मजकूर कीं श्री समर्थांची प्रकृति चांगली आहे. हात जळालेला अद्यापपावेतों जशाचा तसाच आहे. थोडी सूज उतरली आहे. औषध दुसरे कोणास लाऊं देत नाहींत. आपण स्वत: औषध लावीत असतात. त्यांची लीला ते जाणोत.

(ड) ता. ९।११।१९१० च्या पत्रांतील उतारा:—

दररोज आरतीचे वेळेस मोरचेल, चवरी, बंदुकीचे बार वगैरे थाटानें चालू आहेत. तसेंच रात्रीं चावडींत जाण्याचे वेळेस भालदार, चोपदारांची चवरी मोरचेल वगैरे ची सुरुवात परवांचे दिवसापासून झाली आहे. आनंदांत असतात.

(रा. रा. नीळकंठराव उर्फ बाबासाहेब सहस्रबुद्धे यांनीं ता. १२-३-११ रोजीं शिरडीहून रा. रा. काकासाहेबांना लिहिलेल्या इंग्रजी पत्राचा अनुवाद).

शिरडीहून जाण्याची परवानगी अद्याप मला कां मिळत नाहीं हें कोडें आतां उलगडलें. कर्टिस साहेब ( त्यावेळीं मध्यभागाचे कमिशनर नंतर सर जॉर्ज कर्टिस, व्हाइस प्रेसिडेन्ट गव्हर्नरसाहेबांचें एक्झीक्युटिव्ह कौन्सिल ), त्यांची पत्नी मिसेस कर्टिस, मॅक्लीनसाहेब ( नगरचे कलेक्टर ) व ( रावबहादूर ) आर. एन्. जोगळेकर ( नेटिव्ह असिस्टंट ) ही मंडळी १० तारखेला येथें सकाळीं आली. या मंडळींच्या आगमनाची आगाऊ वर्दी मुळींच नव्हती. कदाचित् त्यांचा हेतु आम्ही येथें राजकीय बाबतींत लुडबुडतों कीं काय हें पाहण्याचाही असेल. कारण ही मंडळी येण्यापूर्वी श्रींनीं एकाएकी रागावल्याचा आविर्भाव करून आपली कफनी वर केली होती व "क्या देखना हय. हम तो फकीर हय. हमारे पास आगे xx व पीछे xx हय" असे उद्गार काढले होते. या श्रींच्या उद्गारांचा ही मंडळी आली तेव्हां उमज पडला. अर्थातच आपल्या हुद्याच्या जोरावर श्रींची जमल्यास गांठ घेऊं इच्छिणाऱ्या या मंडळीस मुलाखात झाल्याशिवायच परत जावें लागलें.

ही मंडळी आली त्यावेळीं मी बाळासाहेब भाटे यांचे घरीं होतों. चावडींत येऊन भेटण्याविषयीं जोगळेकरांचा बाळासाहेबांना निरोप आला, परंतु बाळासाहेबांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. तथापि माझ्या बोलावण्यावरून जोगळेकरच आम्हाला भेटण्यास बाळासाहेबांच्या घरीं आले व नंतर आम्ही सर्वजण चावडींत गेलों. कर्टिससाहेबांनीं व मॅक्लीन साहेबांनीं मला बरेचसे प्रश्न विचारले व त्याचे जबाब इतके समाधानकारक दिले गेले कीं जातानां श्रींनां देण्याकरितां मजजवळ दोघां साहेबांनीं प्रत्येकी रु. ५ व जोगळेकरांनीं रु. २ मिळून रु. १२ दिले. प्रथम श्रींनीं दक्षिणा घेण्याचें नाकारलें व घेतली तेव्हां जवळ बसलेल्या एका गरीबाला देऊन टाकली. त्याच संध्याकाळीं रा. ब. जोगळेकरांनां मी एक लांबलचक पत्र लिहिलें. व आतां मला कमिशनरच्या आफीसांतील एका कारकुनाकडून असें

वाटलें की तें पत्र मिसेस कर्टिसला कारण विचारार्थ वाटलें व त्यांनीं ते ठेऊन घेतलें. आज मी जोगळेकरांना आपली एक पत्र लि. व मिसेस कर्टिसना दाखविण्याकरितां पाठवीत आहे. ही पत्रें बाबासाहेब [illegible] मिळी होती व श्रींच्या परवानगीनें पाठविली. कर्टिस सर्व प्रकार [illegible] समाधानकारक झाला. येथें काम मिळूं शकतें व ते कर्टिस मिळवायचें [illegible] आतां त्या साहेबांना व बाईला कळलें आहे. आज सकाळीं दुसरें पत्र पाठविण्याविषयीं परवानगी विचारण्यास मी श्रीकडे गेलों होतों तेव्हां श्रींनीं माझ्या मस्तकावर आपला हात ठेवून मला विशिष्ट आशिर्वाद दिला.

वरील पत्रासंबंधीं आम्हांला बाबासाहेबाकडून खालीलप्रमाणें ज्यास्त माहिती मिळाली.

ही सर्व मंडळी महाराज निजत असत त्या चावडींत उतरली होती. मंडळी आली त्यावेळीं महाराजांचें तोंड धुणें चाललें होतें. तोंड धुणें संपल्यावर नित्यक्रमाप्रमाणें महाराज भिक्षेला निघाले. चावडीपुढें स्वारी आली त्यावेळीं मिसेस कर्टिस चावडींतून खालीं आल्या व आदरानें महाराजाजवळ येऊन आपल्या धर्मसांप्रदायाप्रमाणें दोन्हीं हात क्रुसाच्या चिन्हांप्रमाणें पुढें करून म्हणाल्या कीं "आपके साथ कुछ बात करने की हय." तेव्हां "आधा घंटा ठेर जाव" असा महाराजांनीं जबाब दिला. भिक्षेहून महाराज चावडीवरून परत जातांना मिसेस कर्टिसनें वरीलप्रमाणें जवळ येऊन पुन्हां विचारलें तेव्हां "एक घंटा ठेर जाव " असें महाराज उद्गारले. ती वेळ न्याहरीची होती. त्या मंडळींनां ज्यास्ती सवड नसल्यामुळें भेट न होतां जावें लागलें.

वरील रु. १२ जेव्हां बाबासाहेबांनीं महाराजांपुढें केले त्यावेळीं महाराज म्हणाले कीं साहेबाची दक्षिणा तर रु. ३० आहे. साहेबांकडून बाबासाहेबांनां फक्त रु. १०च मिळाले होते त्यामुळें ते बुचकळ्यांत पडले. महाराजांचे बोल वृथा नसावयाचे ही त्यांच्या मनाची खात्री. शेवटीं तपासाअंतीं असें कळलें कीं, कर्टिससाहेबांनीं महाराजांना देण्याकरितां प्रथम दोनच रुपये काढले, त्यावर कर्टिसबाईनीं "तुमच्या योग्यतेप्रमाणें तुम्हीं निदान रु. २५ दिले पाहिजेत" असें म्हटलें. तेव्हां हे पंचवीस व मॅकूलीन साहेबांचे पांच मिळून तीस रुपये आले व चावडींत या प्रमाणें भाषा झाल्याची महाराजांनीं ही खूण दिली.

——:०:——

# अध्याय ३४ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

पूर्वील अध्यायीं उदी महिमान । केलें यथातथ्य कथन ॥
प्रकृताध्यायींही तेंच निरूपण । विवरूं गुणलक्षण पुढारा ॥ १ ॥
तीच मागील कथेची संगती । तेंच उदीचें वैभव संप्रती ॥
श्रोतीं परिसिजे स्वस्थ चित्तीं । सुख संवित्ती प्रीत्यर्थ ॥ २ ॥
रोग दुर्धर हाडयाव्रण । कोण्याही उपायीं होईना शमन ॥
साई हस्तींच्या उदीचें चर्चन । करी निर्मूलन व्यथेचें ॥ ३ ॥
ऐशा या उदीच्या कथा अनेक । दिग्दर्शनार्थ कथितों एक ॥
श्रवण करितां वाटेल कौतुक । अनुभवपूर्वक म्हणोन ॥ ४ ॥
जिल्हा नाशीक मालेगांवीं । डॉक्टर एक पदवीधर पाहीं ॥
होती तयांचे पुतण्यास कांहीं । व्यथा जी राही न औषधें ॥ ५ ॥
स्वयें वैद्य स्नेही वैद्य । केले उपचार नानाविध ॥
कुशल शस्त्रक्रियाप्रबुद्ध । ठकले निर्बुद्ध जाहले ॥ ६ ॥
रोग तो होता हाडयाव्रण । रूढ अपभ्रंश हाडयावर्ण ॥
व्याधी महादुर्धरविलक्षण । येईना गुण औषधें ॥ ७ ॥
सर्वोपचार देशी विदेशी । झाले फिटली सर्व असोशी ॥
करोनि पाहिलें शस्त्रक्रियेशीं । कांहींही यशस्वी होईना ॥ ८ ॥

पुतण्या तो वयानें लहान । वेदना त्या न होती सहन ॥
कष्टे कासावीस प्राण । उद्विग्न मन आप्तेष्ट ॥ ९ ॥
जाहली उपाय परमावधी । यत्किंचितही शमेना व्याधी ॥
तयास आप्तेष्ट संबंधीं । म्हणती आराधा दैवतें ॥ १० ॥
देवदैवतें कुलस्वामी । यांतून कोणीही येईना कामीं ॥
कानीं आलें शिरडी ग्रामीं । अवलिया नामी वसे हें ॥ ११ ॥
ते शिरडीचे संतप्रवर । साई महाराज योगीश्वर ॥
केवळ दर्शनें व्याधी परिहार । करिती साचार परिसिलें ॥ १२ ॥
हेत उपजला साईदर्शनीं । निश्चित केलें मातापितयांनीं ॥
पाहूं हा तरी उपाय करूनी । नांव घेऊनि देवाचें ॥ १३ ॥
म्हणती तो महान अवलिया । तेणें निजहस्तें उदी लाविलिया ॥
दुर्धर रोग जाती विलया । अनुभव घ्यावया काय वेंच ॥ १४ ॥
चला वंदूं तयाचे पाय । करूंन पाहूं शेवटचा उपाय ॥
तेणें तरी टळो हा अपाय । तरणोपाय हा एक ॥ १५ ॥
असो पुढें ते मातापितर । करूनिया आवराआवर ॥
होऊनि साईदर्शना आतुर । शिरडीस सत्वर पातले ॥ १६ ॥
येतांच बाबांचें दर्शन घेतलें । चरण वंदुनि लोटांगणि आले ॥
दुःख बाळाचें निवेदन केलें । उभे ठेले सन्मुख ॥ १७ ॥
विकळवाणी जोडूनि पाणी । विनटोनी श्रीसाई चरणीं ॥
मुख करोनि केविलवाणी । करिती विनवणी साईशीं ॥ १८ ॥
व्यथा पीडित हें बाळ म्हणती । दुःख न देखवे आम्हाप्रती ॥
सुचे न काय करावें पुढतीं । दिसेना धडगती आम्हातें ॥ १९ ॥
पुत्रदुःखाच्या अवकळा पाहतां । थोर शीणलों साई समर्था ॥
तरी अभयकर याचिये माथां । ठेवून व्यथा निवारावी ॥ २० ॥
परिसोन अपुलें महिमान । केलें आम्ही येथवर आगमन ॥
अनन्यभावें आलों शरण । एवढें जीवदान द्या आम्हा ॥ २१ ॥

तैंव तो साईकरुणामूर्ति । आश्वासिता होय तयांप्रती ॥
मशीदीच्या आश्रया जे येती । तयां न दुर्गती कल्पांतीं ॥ २२ ॥
आतां तुम्ही निश्चिंत असा । उदी घ्या त्या व्रणावर फांसा ॥
येईल गुण आठाचां दिवसा । ठेवा भरंवसा देवावरी ॥ २३ ॥
मशीद नव्हे ही द्वारावती । येथें जयांचे पाय लागती ॥
तात्काळ क्षेम आरोग्य पावती ॥ येईल प्रतीती तुम्हांही ॥ २४ ॥
येथें येतां आराम न पडे । हें तो कालत्रयींही न घडे ॥
जो या मशीदीची पायरी चढे । तयाचे बेडे पार जाणा ॥ २५ ॥
पुढें बाबांचे आज्ञे करून । व्यथितास सन्मुख बैसवून ॥
पायावर बाबांनीं हात फिरवून । कृपावलोकन तें केलें ॥ २६ ॥
व्यथा ही तो केवळ दैहिक । असेना का ती दैवीक ॥
अथवा दुर्धर मानसीक । समूलहारक दर्शन ॥ २७ ॥
पाहोनि श्रीसाईचें मुख । ठायींच विरालें सकळ दुःख ॥
सेवन करितांच वचन पीयूष । परम सुख रोगिया ॥ २८ ॥
असो पुढें ते तैसेच तेथ । राहिले चार दिवसपर्यंत ॥
गेला व्याधीस आराम पडत । विश्वासही जडत साईपदीं ॥ २९ ॥
तदनंतर तीं तिघेंजणें । बाबांचिया पूर्ण अनुमोदनें ॥
परतलीं आनंद निर्भरमनें । संतुष्टपणें गांवासीं ॥ ३० ॥
हा काय लहान चमत्कार । हाडव्याव्रणास पडला उतार ॥
उदी आणि कृपेची नजर । हाच कीं उपचार अपूर्व ॥ ३१ ॥
ऐसें हें महापुरुष दर्शन । भाग्यें लाधतां आश्वासन ॥
कल्याणकारक आशिर्वचन । तेणेंच निर्मूलन व्याधींचें ॥ ३२ ॥
असो कांहीं दिवस जातां । उदी व्रणावर लावितां सेवितां ॥
घाय भरला सुकतां सुकतां । लाधला आरोग्यता* तो मुलगा ॥ ३३ ॥

* ठाणें जिल्ह्यांत बेलापुराजवळ तुरभे गांवी शांताबाई या नांवाची बाई राहत असते. तिच्या डाव्या हाताच्या आंगठ्यास हाडव्याव्रण झाला होता.

ऐकून मालेगांवीं हें चुलता । साईदर्शनीं उपजली उत्सुकता ॥
मनीं म्हणे मुंबईला परततां । पुरवूं आतुरता पदी ॥ ३४ ॥
पुढें मुंबईलागीं जें निघती । मालेगांवीं मनमाडावरती ॥
घातला कोणी विकल्प चित्तीं । निश्चय त्यागिती शिरडीचा ॥ ३५ ॥
सत्कार्याची ऐसीच रीती । आरंभीं कुत्सित जन मोडा घालिती ॥
लोकप्रवादा बळी न पडती । अंतीं सद्गती तयांसची ॥ ३६ ॥
मग ते संत दर्शन डांवलुनी । गेले थेट मुंबई लागुनी ॥
उरली रजा आलीबागेस राहुनी । भोगावी मनीं हा संकेत ॥ ३७ ॥
ऐसा निश्चय जाहल्यावरी । तीन रात्रीं हारोहारी ॥
ऐकिला ध्वनी निद्रे माझारी । 'अजून मजवरी अविश्वासना' ॥ ३८ ॥
लागोपाठ ही अशरीर वाणी । ऐकूनि डॉक्टर विस्मित मनीं ॥
निश्चय केला शिरडी प्रयाणीं । अन्वर्थ ध्वनी वाटला ॥ ३९ ॥
परी एकासी दूषित ज्वर । डॉक्टरांचेच तया उपचार ॥
तयास आराम पडलीयावर । निघणें सत्वर ठरविलें ॥ ४० ॥
परी तो ज्वर मोठा प्रखर । गुणा न येती कांहीं उपचार ॥
पडे न लवमात्रही उतार । घडे न सत्वर निर्गमन ॥ ४१ ॥
मग ते मनीं करिती निर्वाण । जरी आज यास येईल गुण ॥
तरी मी उद्यांच न दडवितां क्षण । शिरडीस प्रयाण करीन ॥ ४२ ॥

---

तो सात वर्षें होता. एके रात्रीं महाराजांनीं तिला स्वप्नांत जाऊन सांगितलें 'तूं डिकेमाली लाव.' बाई जागी झाली तों तिला मोठा आनंद वाटूं लागला. व तिनें व्रणाला डिकेमाली लावली व तिचा व्रण बरा झाला. तिनें मग या सर्व मजकुराचें कार्ड महाराजांस लिहून पाठविलें. त्या कार्डावर तारीख १ सप्टेंबर १९१८ ही आहे.

१ मालेगांव आणि मनमाड या दोन्ही ठिकाणीं. २ घ्यावयाचें सोडून.
३ लागोपाठ.

ऐसा करितां दृढ संकेत । प्रहरा दो प्रहरा ज्वरही उतरत ॥
झाला सफल तयाचा हेत । निघाले शिरडीप्रत डॉक्टर ॥ ४३ ॥
यथा संकल्प शिरडीस गेले । मनोभावें चरण वंदिले ॥
बाबांहीं अंतरीचे अनुभव पटविले । लक्ष जडविलें निजसेवे ॥ ४४ ॥
मस्तकीं हस्त साशिर्वाद । ठेविला दिधला उदीप्रसाद ॥
पाहूनि साईचा महिमा अगाध । विस्मयाविष्ट जाहले ॥ ४५ ॥
राहिले तेथें चार दिवस । परतले डाक्टर आनंद मानस ॥
पुरे न होतां पंधरा दिवस । गेले विजापुरास बदलीवर ॥ ४६ ॥
हाड्या व्रणाचिया ओढी । आली साई दर्शन परवडी ॥
जडली संतचरणीं गोडी । जोडिली जोडी अक्षयी ॥ ४७ ॥
असेच एकदां डॉक्टर पिल्ले । नारू व्यथेनें व्याकूळ झाले ॥
एकावर एक सात झाले ॥ बहुत कष्टले जीवाला ॥ ४८ ॥
साईबाबांचें भारी प्रेम । 'भाऊ' आवडतें टोपणनाम ॥
भाऊचें नित्य कुशल क्षेम । पुसावें परम आवडीनें ॥ ४९ ॥
मशिदीमाजी सांजसकाळ । कठड्या सन्निध भाऊचें स्थळ ॥
भाऊपाशीं बहुत काळ । गोष्टींचा सुकाळ परस्परा ॥ ५० ॥
भाऊ पाहिजे चिलीम ओढितां । भाऊ पाहिजे विडी फुंकितां ॥
भाऊ पाहिजे न्याय निवडितां । जवळ नसतां करमेना ॥ ५१ ॥
असो ऐसी तयांची कथा । दुःसह होऊनि नारूची व्यथा ॥
भाऊनीं अंथरूण धरिलें विकलता । दुःखाद्वेगता दुर्धर ॥ ५२ ॥
ऐसा तो प्रसंग दारुण । मुखीं साई नाम स्मरण ॥
पुरे यातना वरें तें मरण । पातले शरण साईतें ॥ ५३ ॥
पाठविती बाबांस सांगून । कंटाळलों हें दुःख भोगून ॥
काय हे किती आंगाला व्रण । नाहीं मज त्राण सोसावया ॥ ५४ ॥

शुद्धाचरणें वर्ततां । कां मजला हे दुःखावस्था ॥
दुष्कर्मांच्या वाटे न जातां । कां मम माथां पाप हें ॥५५ ॥
मरणप्राय नारूच्या वेदना । वाचा न आतां सोसवती आपणां ॥
याहून आतां येऊं द्या मरणा । भोगीन यातना पुढारा ॥ ५६ ॥
भोगिल्यावीण नाहीं गती । आणिक जन्म घेऊं लागती ॥
परी प्रारब्धभोग कधींही न चुकती । मीही मंदमती हें जाणें ॥ ५७ ॥
सुखें घेईन दहाजन्म । तेथें हें भोगीन माझें कर्म ॥
कराया प्रकृत जन्माचा उपरम । एवढा हा धर्म मज वाढा ॥ ५८ ॥
पुरे आतां या जन्माचें जिणें । सोडवा मज जीवेंप्राणें ॥
नको आतां हे कष्ट सोसणें । हेंच मागणें मागतों ॥ ५९ ॥
परिसून प्रार्थना सिद्धराणा । दया उपजली अंतकरणा ॥
डॉक्टर पिल्लयाचिया समाधाना । वर्षलें करुणामृत तें सेवा ॥ ६० ॥
मग भक्तकाम कल्पद्रुम । पाहूनि दुःखावस्था ती परम ॥
करावया लागी तीचा उपशम । काय उपक्रम मांडिला ॥ ६१ ॥
निरोप आणिला दीक्षितांनीं । बाबांनीं तें वृत्त परिसुनी ॥
म्हणाले सांग तयास जाऊनी । निर्भय मनीं राही तूं ॥ ६२ ॥
आणिक तयास पाठविती सांगू । किमर्थ दहा जन्मांचा पांगू ॥
अवघ्या दहा दिवसाचा भोगू । भोगूं विभागून परस्पर ॥ ६३ ॥
मोक्ष स्वार्थ वा परमार्थ । द्यावया मी असतां समर्थ ॥
हाच का तुझा पुरुषार्थ । मरणानर्थ मागसी ॥ ६४ ॥
आणवा तयास उचलूनी । भोग हा साहूं कीं तो भोगूनी ॥
जावें न ऐसें गांगरूनी । आणावा मारूनि पाठीवर ॥ ६५ ॥

असो डॉक्टर ऐसिये स्थिती । आणिले तात्काल मशिदीप्रती ॥
गालीचा तक्या काढुनी हातीं । दिधला तयांप्रती बाबांनीं ॥ ६६ ॥
ठेविला आपुले सन्यभागीं । फकीर बाबा बैसत ते जागीं ॥
म्हणाले टेकून पड ये उगीं । चिंता वाउगीं करूं नको ॥ ६७ ॥
करी स्वस्थ लांब पाय । जेणें तुजला आराम होय ॥
संचित संपेना भोगिल्या शिवाय । खरा उपाय तो हाची ॥ ६८ ॥
इष्टानिष्ट सुखदुःख । संचितानुसार अमृत वा विख ॥
हें प्रवाहपतित द्वंद्व देख । धरीन हरिख वा शोक ॥ ६९ ॥
जे जे येईल तें तें साहे । अल्ला मालीक वाली आहे ॥
सदा तयाच्या चिंतनीं राहे । काळजी वाहे तो सारी ॥ ७० ॥
चित्त वित्त काया वाणी । सहित रिघावें तयाचे चरणीं ॥
असतां निरंतर तयाचे स्मरणीं । दिसेल करणी तयाची ॥ ७१ ॥
तंव ते वदती पिल्ले डॉक्टर । पट्टी बांधिती नारूवर ।
नानासाहेब चांदोरकर । परी न उतार कांहींच ॥ ७२ ॥
बाबा म्हणती नाना पागल । पट्टी सोड तूं मरशील ॥
आतां काऊ येऊन टोंचील । मग तूं होशील चांगला ॥ ७३ ॥
असो ऐशा वार्ता चालतां । अब्दुल आला तात्काल वरता ॥
पणत्यांत तेल घालावयाकरितां । काय अवचिता तें घडलें ॥ ७४ ॥
मशीद आधीं ती सांकड । भक्तांची होत बहुत भीड ॥
त्यांतची पिल्ले यांची गडबड । चालेंरूं अवघडला अब्दुल ॥ ७५ ॥
अब्दुल्ला निजकार्यीं दक्ष । पणत्यांकडे तयाचें लक्ष ॥
तेणें पिल्यांकडे जाहलें दुर्लक्ष । प्रकार विलक्षण घडला तैं ॥ ७६ ॥

---

१ वेडा. २ कावळा. ३ मशिदींत दिवाबत्ती करणारा श्रींचा एक भक्त. ४ थोडया जागेची दाटी. ५ पाऊल टाकावयास.

अब्दुल्लो तरी करील काय । होणारापुढें नाहीं उपाय ॥
पिल्यानीं लांबविला होता जो पाय । चुकून पाय पडला वरी ॥७७॥
आधींच पाय होता सुजला । तेथेंच अब्दुल्चा पाय पडला ॥
मग पिल्ल्यांनीं जो ठणाणा केला । अति कळवळला जीव तें ॥ ७८ ॥

१ अबदुलभाई हा नांदेडचा राहणारा असून महाराजांचे समाधीचे आधीं नऊ दहा वर्षांपासून शिर्डीसच सेवेसाठीं येऊन राहिला आहे. समाधी नंतरही कांहीं मुशाहिरा न घेतां फक्त अन्नवस्त्र घेऊन सेवा करीत राहिला आहे. महाराज देहधारी असतांना त्याजवर अत्यंत काम पडत असे व तें सर्व तो मोठ्या प्रेमानें करीत असे. नेहमीं द्वावडींत राहत असे व आतां समाधी-पाशींच खोलींत राहतो. रात्रीसुद्धां विश्रांती न घेतां कुराण पढण्यांतच बराच वेळ घालवीत असे आणि अजूनहि तोच क्रम त्याचा चालू आहे. घरीं त्याची आई, बायको व मुलगा इतकी मंडळी आहेत पण त्यांना सर्वांना सोडून तो शिर्डीस राहिला आहे. त्याची आई व मुलगा कधीं कधीं शिर्डीस येतात. बायकोही एकदां आली होती पण तो त्यांपैकीं कोणाचेंही मोहांत न पडतां सेवा करीत तेथेंच असतो. त्याच्या मुलाच्या लग्नाची काळजी त्याच्या आईला फार वाटत असे व तिनें एके ठिकाणीं जुळविण्याची शिकस्त केली पण अबदुलभाई फकीर झाला आहे. त्याच्या तेथें आमची मुलगी द्यावयाची नाहीं असा रोकडा जबाब मिळाला. त्यानंतर ती बाई तेथें आली व महा-राजांजवळ गाऱ्हाणें केलें. महाराज म्हणाले सबुरी धर. घाबरूं नको. मुलाला चांगली मुलगी मिळेल व तें आपोआप जमून येईल. अर्थात महाराजांचे म्हणण्याप्रमाणें घडून आलें.

एकदां अबदुलभाईची आई व मुलगा एका गांवाला गेले असतां तेथें एका गृहस्थाची गांठ पडली व त्यानें आपण माझी मुलगी करा असा आग्रह धरिला. त्याला कांहीं मंडळींनीं सांगितलें कीं मुलाचा बाप फकीर झाला आहे. त्यावर तो म्हणाला मीही फकीर झालों तरी हरकत नाहीं. माझी मुलगी मी या मुलालाच देणार. त्याप्रमाणें तें लग्नही ताबडतोब उरकून घेतलें. त्या

मारिली एकदांची किंकाळी । वस्त्रेंही जाऊनि भिजली कळी ॥
विनवीत बाबांस बद्धांजुळी । करुणा समेळीं तें परिसा ॥ ७९ ॥
नारु फुटून वाहूं लागती । पिडे अत्यंत अस्वस्थ चित्तीं ॥
एकीकडे आक्रोश करिती । गाऊं अनुसरती दुसरीकडे ॥ ८० ॥
करम कर मेरे हाल परतू करीम । तेरा नाम रहिमान है और रहीम ॥
तूंही दोनों आलमका सुलतान है । जंहांमें नुमाया तेरी शान है ॥
फना होने वाला है सब कारोबार । रहे नूर तेरा सदा आशकार ॥
तूं आसिकका सदा मददगार है ।
राहून राहून उठतसे कळ । जीव कळवळला पडे विकळ ॥
साईबाबांचा हा खेळ । झाली अटकळ सर्वांची ॥ ८१ ॥
बाबा वदती पहा भाऊ । लागला बरें आतां गाऊं ॥
पिडे तयांस पुसती तो काऊ । अजून खाऊं येणार का ॥ ८२ ॥
तेव्हां बाबा वदतो तूं जाईं । स्वस्थ वाड्यांत पडून राहीं ॥
आतां काऊ फिरुन नाहीं । येणार पाहीं टोचावया ॥ ८३ ॥
तोच नाहीं का येऊन गेला । तोच तो ज्याणें पाय दिधला ॥
तोच तो काऊ टोंचून पळाला । नारु तळाला घातला ॥ ८४ ॥
कैंचा काऊ आणि कावळा । होणार वृत्तांत समक्ष घडविला ॥
काक अब्दुलारूपें प्रकटला । केलें बोला अन्वर्थ. ॥ ८५ ॥
बोल नव्हे तो ब्रम्हलेख । कर्मांवरीही मारील मेख ॥
अल्पावकाशेंच भाऊस देख । लागलें सुख वाटावया ॥ ८६ ॥
उदीलेपन उदीसेवन । हेंच औषध हेंच अनुपान ॥
जाहलें समूळ रोग निरसन । उगवला जों दिन दहावा ॥ ८७ ॥

---

गृहस्थाची एक मोठी मुलगी लग्नाची होती तिचें लग्न जुळलें होतें पण लग्न व्हावयाला अवकाश होता तरीही त्यानें न थांबतां धाकट्या मुलीचें लग्न अबदुलभाईच्या मुलाशीं तावडतोब करून टाकलें.

१ जगतांत.

निघाले सजीव सप्तजंतू । जखमा गाजील बारीक तंतू ॥
वेदना दुर्धर जाहल्या शांतू । दुःखासीं अंतू जाहला ॥ ८८ ॥
जाणोनि ऐशिया चमत्कारा । पिल्ले साश्चर्य जाहले अंतरा ॥
नेत्र स्रवले प्रेमधारा । पाहोनि उद्धाराचरिततें ॥ ८९ ॥
बाबांचिया चरण संपुटीं । पिल्ले तेथेंच घालिती मिठीं ॥
बाष्पावरोध जाहला कंठी । फुटे न ओष्ठी कीं वाचा ॥ ९० ॥
सांगून आणीक एक अनुभव । करूं हा संपूर्ण उदीप्रभाव ॥
जया मनीं जैसा भाव । हाच या गौरव ग्रंथाचा ॥ ९१ ॥
एकदां माधवराव ज्येष्ट । बापाजी तयांचा बंधू कनिष्ट ॥
कैसें तयावरी येतां अभीष्ट । उदीनें अभीष्टें पावले ॥ ९२ ॥
ऐसा या उदीचा प्रभाव । किती वानावा म्यां नवलाव ॥
ग्रंथि ज्वरादि रोग सर्व । औषध अपूर्व नाहीं दुजें ॥ ९३ ॥
असतां साऊळ विहिरीवर । कुटुंबासीं आला ज्वर ॥
ग्रंथी उद्भवल्या जांघेवर । मनीं घाबरला बापाजी ॥ ९४ ॥
पाहून कुटुंब अति हैराण । तैसाच रात्रीचा समय भयाण ॥
जाहला बापाजी भ्रांतमन । गळालें अवसान तयाचें ॥ ९५ ॥
धांव ठोकिली रातोरात । सकंप भयभीत शिरडीस येत ॥
जाहला कथिता समस्त वृत्त । निजबंधूप्रत तेधवां ॥ ९६ ॥
म्हणती आल्या दोन गांठी । ज्वर संतप्त झालीसे कष्टी ॥
चला पहा कीं अपुल्या दिठी । दिसे न गोठी मज बरवी ॥ ९७ ॥
बापाजी बोलतां केविलवाणी । माधवरावजी दचकले मनीं ॥
गेलें पळोनी तोंडचें पाणी । मन ठिकाणीं पडेना ॥ ९८ ॥
माधवराव मोठे विवेकी । ग्रंथी म्हणतां भरली धडकी ॥
ग्रंथिज्वराची तडकाफडकी । आहेच ठाउक कीं अवघियां ॥ ९९ ॥

१ उद्धार कृत्य २ चिंतलेला हेतू ३ शिरडी नजीक एक ठिकाण.

प्रसंग बरवा वा विकट । कार्य असो इष्टानिष्ट ॥
आधीं साईंस पुसावी वाट । परिपाठ हा चोपट शिरडींत ॥ १०० ॥
मग ते जैसें जैसें कथिती । आचरावें तैसे स्थितीं ॥
तेच भक्तसंकट निवारिती । वर्णावे किती अनुभव ॥ १०१ ॥
असो या नित्य पाठानुसार । माधवरावही करिती विचार ॥
आधीं बाबांस केलें हें सादर । साष्टांग नमस्कारपूर्वक ॥ १०२ ॥
म्हणती जयजय साईनाथा । दया करावी आम्हां अनाथा ॥
हें संकट काय ओढवलें आतां । नसती चिंता उद्भवली ॥ १०३ ॥
तुजवांचून कवणा आना । आम्ही जाऊं कराया याचना ॥
दूर करीं त्या पोरीच्या यातना । आशिर्वचना देई गा ॥ १०४ ॥
करी एवढें संकट हरण । आम्हां कैवारी कोण तुजवीण ॥
करी या दुर्धर ज्वराचें शमन । ब्रीद संरक्षण करी गा ॥ १०५ ॥
पुसती अनुज्ञा जावयास । बाबा वदती तेव्हा तयास ॥
नको जाऊं अपरात्रीस । उदी दे तियेस पाठवुनी ॥ १०६ ॥
कशाच्या ग्रंथी कशाचा ताप । आपुला अल्ला मालिक बाप ॥
बरें होईल आपोआप । होईल सुखरूप निर्घोर ॥ १०७ ॥
मात्र तूं सकाळीं सूर्योदयीं । साऊळ विहिरीस जाऊन येई ॥
आतांच नको जाण्याची घाई । स्वस्थ राही तूं येथें ॥ १०८ ॥
उदईकही जाऊन यावें । नलगे निरर्थक कुचंबावें ॥
उदी लावितां सेवितां भावें । किमर्थ भ्यावें आपण ॥ १०९ ॥
परिसतां हें बापाजी भ्याला । तयाचा मोठा हिरमोड झाला ॥
माधवराव जाणती औषधीपाला । परी न समयाला उपयोग ॥ ११० ॥
एक साई कृपेवीण । औषधींस नाहीं गुण ॥
हें एक वर्म ही एक खूण । माधवराव पूर्ण जाणती ॥ १११ ॥

आज्ञा बाबांची वंदून । उदी दिधली पाठवून ॥
राहिले माधवराव स्वस्थ मन । परतला उद्विग्न बापाजी ॥ ११२ ॥
पाण्यांत उदी कालवून । पोटांत पाजिली अंगा लाऊन ॥
घाम सुटला डवडवून । निद्रा लागून राहिली ॥ ११३ ॥
सूर्योदय जाहल्यावरी । कुटुंबास वाटली हुपारी ॥
नाहीं ज्वर ना गाठी त्रिपारी । बापाजी करी आश्चर्य ॥ ११४ ॥
इकडे माधवराव जे उठले । शौच मुखमार्जन आटपलें ॥
साऊळ विहिरीस जावया निघाले । दर्शना आले मशिदीं ॥ ११५ ॥
घेतलें बाबांचें दर्शन । घातलें पायीं लोटांगण ॥
उदी समवेत आशिर्वचन । मिळतांच तेथून निघाले ॥ ११६ ॥
मशिदीची पायरी उतरतां । बाबा तयांस ऐकिलें आज्ञापितां ॥
‘ शामा उठाउठी ये मागुता । विलंब लागतां कामा नये ’ ॥ ११७ ॥
असेल कीं भावजयी विव्हळ । कैशी साहील दां ग्रंथींची जळजळ ॥
पडली असेल करीत तळमळ । वाटेनें हळहळ दीरास ॥ ११८ ॥
करिती बाबा कांहीं इशारा । कां ये सत्वर म्हणती माघारा ॥
तेणें शामा होय घाबरा । चाले झरझरा मार्गानें ॥ ११९ ॥
घाई घाई साऊळ विहिर । गांठपर्यंत नव्हता धीर ॥
पाऊल ठेवितां उंबरठ्यावर । चमत्कारले अंतरीं ॥ १२० ॥
जियेस गतरात्रीं ग्रंथीज्वर । चहा ठेवितां पाही चुलीवर ॥
माधवराव विस्मितांतर । जाहले स्थित्यंतर पाहुनी ॥ १२१ ॥
तंव ते बापाजीस पुसत । ही तो नित्य व्यवसायरत ॥
बापाजी म्हणे ही सर्व करामत । उदीची निश्चित बाबांच्या ॥ १२२ ॥
म्हणे मी येतांच उदी पाजिली । चोळून चोळून सर्वांगा चर्चिली ॥
तात्काळ घर्मांचित तनू झाली । निद्रा लागली स्वस्थपणें ॥ १२३ ॥

पुढें जंव सूर्योदय होत । उठूनी बैसली खडखडीत ॥
कोठी विराल्या ज्वरासहित । हें सर्व चरित साईचें ॥ १२४ ॥
त्यांना पाहूनि ऐसी स्थिती । तात्काळ आठवली साईची उक्ती ॥
"उठाउठीं येई तूं मागुती" । साश्चर्य चित्तीं जाहला ॥ १२५ ॥
ज्याच्या आर्थीच कार्य संपलें । चहा घेऊन माधवराव परतले ॥
मशिदींत जाऊन पहिले । चरण वंदिले बाबांचे ॥ १२६ ॥
म्हणती देवा काय हा खेळ । तूंचि उडविसी मनाची खळबळ ॥
बसल्या जागीं उठविशी वाहुटळ । मागुती निश्चळ तूंची करिसी १२७
बाबा तयास प्रत्युत्तर देती । पहा कर्माची गहन गती ॥
मी करी ना करवी कांहींही निश्चिती । कर्तृत्व मारिती मजमाथां १२८
कर्मे जीं जीं अदृष्टें घडत । मी तो तेथील साक्षीभूत ॥
कर्ता करविता तो एक अनंत । कृपावंतही तो एक ॥ १२९ ॥
मी ना देव ना ईश्वर । मी ना 'अनलहक्क' ना परमेश्वर ॥
'यादे हक्क' मी यादगार । बंदा मी लाचार अल्लाचा ॥ १३० ॥
सांडूनिया अहंकार । मानूनि तयाचे आभार ॥
तयावरी जो घालील भार । बेडा तो पार होईल ॥ १३१ ॥
असाच एका इराणीयाचा । अनुभव ऐका महत्वाचा ॥
तयाच्या तान्ह्या मुलीची वाचा । बसतसे तासा तासास ॥ १३२ ॥
तासा गणित आकडी येई । पडो धनुकडी होऊन ठायीं ॥
अत्यावस्था बेशुद्ध होई । उपाय कांहीं चालेना ॥ १३३ ॥
पुढें तयांचा एक मित्र । वर्णी तयास उदीचें चरित्र ॥
म्हणे ऐसें रामबाण विचित्र । औषध अन्यत्र असेना ॥ १३४ ॥
जावें अविलंबें पारल्यास । उदी मागावी दीक्षितांस ॥
असे तयांचे संग्रहास । अति उल्हासता देतील ॥ १३५ ॥
ती उदी मग रोज थोडी । साईस्मरण श्रद्धा आवडी ॥
पाजितां ही जाईल आंकडी । सौख्य परवडी लाधाल ॥ १३६ ॥

ऐसें ऐकून मग तो पारशी । उदी मागून दीक्षितांपाशीं ॥
मुलीस पाजितां नित्यनेमेंसीं । आरोग्य निजसीं लाधलें ॥ १३७ ॥
तासातासां जी होतसे घावरी । तात्काळ उदीनें जाहली बरी ॥
जाऊं लागले मध्यंतरीं । लहरी लहरींत सात तास ॥ १३८ ॥
तासातासानें येणारी लहर । पडतां साता तासांचें अंतर ॥
कांहीं काळ क्रमिलियानंतर । *परिहार समग्र जाहला ॥ १३९ ॥
हरद्यानजीक एका गावांत । रहातसे एक वृद्ध गृहस्थ ॥
मुतखड्याच्या व्याधीनें ग्रस्त । जाहला त्रस्त अतिशय ॥ १४० ॥
हा रोग शस्त्रक्रियेवीण । अन्यथा नाहीं याचें निवारण ॥
म्हणूनि शस्त्रक्रियाप्रवीण । पहा तरी कोण जनवदती ॥ १४१ ॥
रोगी परम चिंतातूर । कर्तव्यार्थीं न सुचे विचार ॥
मरणोन्मुख कृश शरीर । दुःख अनिवार सोसेना ॥ १४२ ॥
शस्त्रप्रयोगा लागे धैर्य । रोगिया अंतरीं नाहीं स्थैर्य ॥
सुदैवें तयाचें नष्टचर्य । संपलें आश्चर्य तें परिसा ॥ १४३ ॥
एरीकडे हा ऐसा प्रकार । तोंच त्या ग्रामीचे इनामदार ॥
साईबाबांचे भक्त थोर । आले गांवावर समजलें ॥ १४४ ॥
तयांपाशीं बाबांची विभूती । नित्य राही हें सर्व जाणती ॥
रोगार्ताचे आप्तेष्ट येती । उदी प्रार्थिती तयांतें ॥ १४५ ॥
इनामदारांनीं उदी दिधली । मुलानें बापास पाण्यांत पाजिली ॥
पांचही मिनिटें नसतील लोटलीं । तोंच की वर्तली नवलपरी ॥१४६॥
उदी प्रसाद अंगी जों भिनला । मूतखडा ठायींचा ढळला ॥
मूत्रद्वारें बाहेर निसटला । आराम पडला तात्काळ ॥ १४७ ॥
मुंबापुरीचे एक गृहस्थ । होते जातीचे प्रभु कायस्थ ॥
होतां प्रसूति समय प्राप्त । स्त्री अत्यावस्थ सर्वदां ॥ १४८ ॥

---

* या उदीचे असे अनेक अनुभव आहेत.

मग कितीही उपाय करा । गूण न एकाही उपचारा ॥
बाईचा जीव होतसे घाबरा । ऐसा बिचारा त्रासला ॥ १४९ ॥
श्रीराममारुती नामें विख्यात । होते एक साईचे भक्त ॥
तयांच्या विचारें हे गृहस्थ । जावया शिरडीप्रत निघाले ॥ १५० ॥
प्रसूतीचा येतां समय । महत् संकटीं पडत उभय ॥
जाहला एकदां मनाचा निश्चय । पावूं निर्भय शिरडींत ॥ १५१ ॥
होणार होईना का निदानीं । होवो तें बाबांचें संनिधानीं ॥
ऐसा संकल्प दृढ करोनी । शिरडीस येऊन राहिले ॥ १५२ ॥
ऐसेंही उभयतां कित्येक मास । करिती जाहलीं शिरडींत वास ॥
पूजा अर्चा साईसहवास । आनंद उभयांस जाहला ॥ १५३ ॥
ऐसा क्रमितां कांहीं काळ । प्रसूति समय आला जवळ ॥
काळजी उद्भवली प्रबळ । संकट टळणार कैसें हें ॥ १५४ ॥
ऐसें म्हणतां म्हणतां आला । प्रसूतीचा दिवस पातला ॥
गर्भद्वाराचा मार्ग अडला । सर्वांस पडला विचार ॥ १५५ ॥

---

नारायण गोपिनाथ दिघे या नांवाचे गृहस्थ मुंबईस राहात असत. त्यांचे पोटांत एक गांठ उत्पन्न झाली. ती फार कठिण होती व तिच्यापासून त्यांना फार त्रास होऊं लागला. मुंबईस एक दोन प्रसिद्ध डॉक्टरांना दाखविली पण कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें त्यांना महाराजांकडे जाण्याविषयीं एका गृहस्थानें सुचविलें. अर्थात तशा स्थितींत जाणें शक्य नव्हतें. ते म्हणाले महाराजांचे आशिर्वादानें ही गांठ फुटून आंतला रोग मळाच्या द्वारानें जाईल तर मला बरें वाटेल व मी महाराजांकडे जाऊं शकेन. त्यावर त्या गृहस्थानें त्यांना महाराजांची उदी दिली, व तिचें त्यांनीं सेवन केलें व दुसरेच दिवशीं सकाळीं गांठ फुटून आंतला पू शौचाच्या द्वारानें जाऊं लागला व दोन चार दिवसांत त्यांना बरें वाटूं लागलें. मग लौकरच ते महाराजांचे दर्शनास गेले.

बाईस होऊं लागल्या यातना । काय करावें कांहीं सुचेना ॥
पुढें चालली बाबांची प्रार्थना । त्यावीण करुणा कवणा ये ॥ १५६ ॥
धांवूनी आल्या शेजारणी । घालूनि बाबांना गाऱ्हाणीं ॥
एकीनें प्याल्यांत ओतूनी पाणी । उदी कालवूनी पाजिली ॥ १५७ ॥
पांच मिनिटें गेलीं न गेलीं । तोंच बाईची सुटका झाली ॥
गर्भस्थिती निर्जीव दिसली । गर्भींच मुकली चैतन्या ॥ १५८ ॥
असो गर्भाची कर्मगती । होईल पुढारा गर्भप्राप्ती ॥
बाई पावली भयनिर्मुक्ती । लाधली संस्थिती सौख्याची ॥ १५९ ॥
वेदना विरहित गर्भ स्रवली । हातीं पायीं सुखें सुटली ॥
महच्चिंतेची वेळ टळली । ऋणी झाली जन्माची ॥ १६० ॥
पुढील अध्याय याहून गोड । परिसतां पुरेल श्रोत्यांचें कोड ॥
निरसूनि चिकित्सकपणाची खोड । भक्तीची जोड लाधेल ॥ १६१ ॥
आम्हा निराकाराची उपासना । आम्ही देणार नाहीं दक्षिणा ॥
आम्ही वाकविणार नाहीं माना । तरीच दर्शना येऊं कीं ॥ १६२ ॥
ऐसा जयांचा कृतनिश्चय । तेही पाहतांच साईचे पाय ॥
दक्षिणेसहित साष्टांग काय । वाहती हा काय चमत्कार ॥ १६३ ॥
उदीचाही अपूर्व महिमा । नेवासकरांचा भक्तिप्रेमा ॥
कैसें दुग्ध पाजूनी भुजंगमा । गृहस्थधर्मा संरक्षिलें ॥ १६४ ॥
ऐसऐसिया कथा उत्तम । परिसतां उपजेल भक्तिप्रेम ॥
संसारदुःखा होईल उपशम । याहूनि परमसुख काय ॥ १६५ ॥
म्हणोनी हेमाड करी विनती । साई चरणीं करोनी प्रणती ॥
प्रेम द्याजी श्रोतयांप्रती । निज सच्चरितीं रसावया ॥ १६६ ॥

स्वस्ति श्री संतसज्जनप्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । उदीमहिमा नाम
चतुस्त्रिंशत्तमोध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥